Exh. 58/D

रे.क.नं. ९४/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल**
**यांचे कोर्टात ...**

**१. सचिन लक्ष्मण जानवे, वगैरे** ... वादी

विरूध्द

**१. नाना जोती कांबळे, वगैरे** ... प्रतिवादी

**यातील प्रतिवादी नं. १, २, ४ ते ९, १२ ते १५, १७, १८, २१ ते २७, ३१, ३३, ३४, ३५, ५२, ५५ ते ६३, ६५, ६६, ६८, ७०, ७१, ७४, ७५, ७८, ७९ व ८१ तर्फे वादीचे दावा दुरूस्तीच्या नि. ४३ चे अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे –**

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज अतिशय चुकीच्या पध्दतीने व मे. कोर्टाची ऑर्डर गृहित धरून दाखल केल्याचे सकृतदर्शनी अर्जातील कथनावरून दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेल्या स्वरूपात चालणेस पात्र नसल्याने नामंजूर होणे कायदेशीर होणार आहे.

Order
R&R
CJJD
17/07/2026

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.17 17:30:03 +0530
MADKE AJIT BHISHMA

२) प्रस्तुत वादीने दाखल केलेल्या दावा दुरूस्ती अर्जामध्ये कलम २ मध्ये नमूद केलेल्या मजकूराप्रमाणे वादी निव्वळ दावेचे टायटल क्लॉजमध्ये न्यायाधिकाराची आकारणी रक्कम रू. २०००/– च्या

ऐवजी रक्कम रू. १३,००,३१,२६,०००/— (अक्षरी रू. तेरा कोटी एकतीस लाख सव्वीस हजार) तसेच दावेच्या आकारणीमध्ये याच प्रकारची दुरूस्ती करून मागत आहे. वास्तविक वादी ज्या कारणाकरीता आकारणीची रक्कम वाढवून मागत आहे त्याचे कोणतेही कारण अर्जात नमूद नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जावर वादी, प्रतिवादीमधील वाद कायमरित्या संपुष्टात येणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणे कायदेशीर होणार आहे.

३) वादीच्या अर्जावरून वादी घाईगडबडीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करून सदरचा दावा वरिष्ठ न्यायालय, कोल्हापूर या ठिकाणी दाखल करण्याकरिता प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. तथापि, आकारणी क्लॉजमध्ये आज्ञार्थी आदेश व मनाई आदेशाची आकारणी कोर्ट फी ॲक्टप्रमाणे केलेली आकारणी योग्य व कायदेशीर आहे. अशा परिस्थितीत निव्वळ या कोर्टाकडून दावा काढून वरिष्ठ कोर्टात दाखल करणेकरिता वादीच्या मर्जीप्रमाणे दावेची आकारणी करता येणार नाही, त्या कारणाकरिता देखील प्रस्तुतचा दावा दुरूस्तीचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे.

४) प्रस्तुत अर्जाचा विचार केलेस सदर अर्जातील मागणी मान्य केलेस वादी, प्रतिवादी यांचे नुकसान होण्याचा विषय नसून, सदर दुरूस्तीमुळे दावेतील वाद कायमरित्या संपुष्टात येतो किंवा नाही याचा विचार होणे आवश्यक आहे. त्याकरिता वादी सदरची आकारणी दुरूस्ती कोणत्या कारणाकरिता करीत आहे तेच कारण अर्जात नमूद नसल्याने अर्ज अनावश्यक दुरूस्तीचा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे.

५) वादीने प्रस्तुतचे दावा दुरूस्ती अर्जात मल्टिप्लिसिटी ऑफ प्रोसिडींग टाळण्याकरीता दुरूस्ती मंजूर होणे आवश्यक आहे असे कारण घेतले आहे. तथापि, सदर दुरूस्तीने पुन्हा मल्टिप्लिसिटी ऑफ प्रोसिडींग होणार आहे. कारण ज्या कारणाकरिता दुरूस्ती मागीतली आहे त्याचे मूळ कारण दुरूस्तीमध्ये कोठेही नमूद नाही. त्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज कायद्यातील तरतुदींचा गैरफायदा घेणेकरिता दाखल केलेचे दिसून येते.

६) **सबब, मे. कोर्टांना विनंती की,**

अ) वादींचा दि. २९/०६/२०२६ रोजीचा नि. ४३ वरील दावा दुरूस्तीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) जरूर तर अन्य ते अनुषंगिक हुकूम याच कामी न्यायाचे कारणास्तव करणेत यावेत.

येणेप्रमाणे म्हणणे असे.

मे. जा. व्हावे.

कागल

दि. १७/०७/२०२६

श्री. विठ्ठल दौलू चव्हाण

श्री. वसंत दगडू सरमोकदम